महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित
(CIN:U40109MH2005SGC153646)
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय
४०० के.व्ही.ग्र.कें. संवसु विभाग चाकण, म.रा.वि.पा.कंपनी मर्यादित
प्लॉट नं.पी.१० मर्सीडीज बेन्झ कंपनी समोर एमआयडीसी चाकण,फेज ३, ता.खेड जि. पुणे ४१० ५०१,
email :- ee6180@mahatransco.in

संदर्भ क्र काअ/४००के.व्ही.ग्र.कें संवसु विभाग/चाकण/मासं No-0275 दिनांक :- 20 SEP 2021

## जाहीर सुचना

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित, ४०० के.व्ही.ग्र.कें. संवसु विभाग चाकण अंतर्गत आय.टी.आय. वीजतंत्री शिकाऊ उमेदवारांची प्रशिक्षणाकरीता भरती घेण्यात येत आहे याकरीता खाली नमूद केलेल्या अटी व शर्तीना अधिन राहून पात्र विदयार्थ्यांनी/उमेदवारांनी दिनांक. ३०.०९.२०२१ पर्यंत www.apprenticeshipindia. org या संकेतस्थळावर आस्थापना क्र. E10202700105 वर नोंदणी करुन ऑनलाईन अर्ज करावे.

| आस्थापनेचा नोंदणी (Registration) क्र. | ट्रेड | एकूण |
|---|---|---|
| E10202700105 | वीजतंत्री (Electrician) | एकूण जागा ०३ |

०१) शैक्षणिक अर्हता-महाराष्ट्र राज्य माध्यमिक शालांत परीक्षा किंवा तत्सम परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे व राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परिषद (NCTVT) नवी दिल्ली मान्यता प्राप्त औदयोगिक प्रशिक्षण संस्थेतुन वीजतंत्री या व्यवसाय परीक्षेत उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

०२) विद्यावेतन शासनाच्या नियमाप्रमाणे लागु राहिल.

०३) पदसंख्या कमी किंवा जास्त करण्याचा व भरती प्रक्रियेशी निगडीत असलेले सर्व निर्णय घेण्याचे अधिकार व्यवस्थापनेकडे राखीव असतील व सदरचे निर्णय उमेदवारास कळविणे व्यवस्थापनेस बंधंनकारक राहणार नाही.

०४) शिकाऊ उमेदवारी भरती प्रक्रियेसाठी आरक्षण शासनाच्या विविध नियमानुसार लागु राहील.

०५) ऑनलाईन अर्ज सादर करताना एस.एस.सी. उत्तीर्ण गुणपत्रिका व आयटीआय उत्तीर्ण गुणपत्रिका यामध्ये नमुद केलेले नाव व आधारकार्डवर नमुद केलेल्या नावाशी सुसंगत आहे किंवा कसे याची पडताळणी करुन माहिती भरावी.

०६) एस.एस.सी.गुणपत्रक/प्रमाणपत्र व आयटीआय उत्तीर्ण गुणपत्रक/प्रमाणपत्र (चार ही सेमिस्टरची) साक्षांकित प्रत ऑनलाईन अर्जामध्ये अपलोड करणे आवश्यक आहे.

०७) शिकाऊ उमेदवारांची सही, पालकांची सही, प्रवर्ग, जन्मतारीख, एस.एस.सी.मार्क, आयटीआय मार्क, ही माहिती अचुक भरण्यात यावी. सदर माहिती उपलब्ध न झाल्यास उमेदवाराचा शिकाऊ उमेदवारी भरती प्रक्रियेसाठी विचार केला जाणार नाही.

०८) शिकाऊ उमेदवारी भरती प्रक्रियेदरम्यान उमेदवाराने राजकीय किंवा इतर अधिका-यांकडुन दबाव आणल्यास संबंधीत उमेदवाराची उमेदवारी रद्द करणेत येईल याची नोंद घ्यावी.

०९) शिकाऊ उमेदवारांनी ऑनलाईन (Online) अर्ज करताना पोर्टलवर फोटो, मुळ प्रमाणपत्राची सुस्पष्ट स्कॅन करुन योग्य रितीने ऑनलाईन (Online) अर्ज सादर करावा. फोटो अथवा मुळ प्रमाणपत्र सुस्पष्ट नसेल तर अशा अर्जाचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

१०) वयोमर्यादा १८ ते ३० वय वर्षे (मागास वर्गीयांसाठी ०५ वर्ष शिथिलक्षम).

११) ऑनलाईन (Online) अर्ज सादर करतांना उमेदवाराने सद्य स्थितीत कार्यान्वित असणारा E-Mail ID व भ्रमणध्वनी क्रमांक नमुद करणे आवश्यक आहे. E-Mail ID व भ्रमणध्वनी क्रमांक कार्यान्वित नसल्यामुळे संपर्क करणे शक्य झाले नाही तर त्याची पुर्ण जबाबदारी उमेदवारावर राहील.

१२) दि.३०.०९.२०२१ नंतर ऑनलाईन नोंदणी केलेल्या उमेदवारांचा शिकाऊ उमेदवारी भरती प्रक्रियेसाठी कोणत्याही परिस्थितीत विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

१३) आरक्षणाचा लाभ घेणा-या उमेदवारांना ऑनलाईन अर्जासोबत जाती प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. तसेच या कार्यालयाने मागणी केल्यास शासकीय नियमाप्रमाणे आरक्षणासंबंधीत कागदपत्रे सादर करणे उमेदवारास बंधनकारक राहील.

१४) शिकाऊ उमेदवारीचा प्रशिक्षण कालावधी पुर्ण केल्यामुळे कंपनीमध्ये नोकरी मिळवण्याचा कोणताही अधिकार प्राप्त होत नाही याची कृपया नोंद घ्यावी.

१५) ऑनलाईन अर्ज प्राप्त उमेदवारांना दस्तऐवज / शैक्षणिक कागदपत्रे पडताळणी करीता ई-मेलद्वारे दिनांक, वेळ व स्थळ कळविण्यात येईल. त्याकरीता खाली नमूद केलेल्या दस्ताऐवजांसह व शैक्षणिक कागदपत्रांसह उमेदवारांनी उपस्थितीत रहावे.

(खालीलप्रमाणे यादी)

अ) पासपोर्ट साईज फोटो-२.

ब) ऑनलाईन नोंदणीचे दस्तऐवज व शैक्षणिक कागदपत्रे (मुळ प्रती)

क) शाळा सोडल्याचा दाखला, बोर्ड प्रमाणपत्र.

ड) आय.टी.आय. गुणपत्रक (चारही सत्र / वार्षिक)

इ) मागासवर्गीय असल्यास जात प्रमाणपत्र.

ई) आधारकार्ड , बॅंक पासबुक (मुळ प्रत)

वरील सर्व कागदपत्रांची छायांकित, साक्षांकित प्रतीसोबत बाळगावी.

१६) सदर भरतीकरीता महापारेषण कंपनीचे वेळोवेळी प्रसारीत केलेले संबंधित परिपत्रके, नियम, अटी व शर्ती लागू राहतील.

**श्री भागवत ज्ञा. बोरूळे**
**कार्यकारी अभियंता (प्रभारी)**
**४०० के.व्ही. ग्र.कें. संवसु**
**विभाग चाकण**